# कार्यालय नगर परिषद ब्रम्हपुरी

## ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर (म.रा.) ४४१२०६


**MUNICIPAL COUNCIL, BRAMHAPURI, DIST- CHANDRAPUR (M.S.)**

**E-mail:- conagarparishad@gmail.com** **Phone:- 07177-272013**


जा.क्र. कावि/नपब्र/स्व. सर्वे. /२०२२/४४ दिनांक १४/११/२०२२

## जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे माहितीकरिता सूचना प्रसिद्ध करण्यात येते की, नगर परिषद ब्रम्हपुरी करिता स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० ची अंमलबजावणी करणे व त्याअंतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध कामे करण्यासाठी नगर परिषद ब्रम्हपुरी अंतर्गत ११ महिन्यांकरिता कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयक (City Co-Ordinator) पद भरतीची कार्यवाही करण्याचे मा. जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक / कार्या-१०/नपप्र/२०२२/४१४ दिनांक ११.११.२०२२ नुसार न.प. ने नियोजित केले आहे.

तरी इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून दिनांक २१.११.२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळात नगर परिषद, ब्रम्हपुरी, जिल्हा-चंद्रपूर येथे विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सीलबंद लिफाफ्यात स्वीकारण्यात येईल. विहित नमुना अर्ज नगर परिषद ब्रम्हपुरी कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक, अनुभव प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रांसह अर्ज विहित मुदतीत सादर करावा. तसेच मुलाखत जिल्हा सह.आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे दिनांक २४.११.२०२२ ला सकाळी ११ ते ६ वाजेपर्यंत होईल. अर्ज सादर करण्याच्या कालावधीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| पदनाम | एकूण पदे | शैक्षणिक पात्रता | अनुभव | वयोमर्यादा | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Co-Ordinator) | ०१ | मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>अ. बी.ई /बी. टेक (कोणतीही शाखा)<br>ब. बी.आर्क<br>क. बी. प्लॅनिंग | अ. स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान सहा महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे.<br>ब. शहर समन्वयक (City Co-Ordinator) चा अनुभव (एकूण वर्षे)<br>क. शहर समन्वयक (City Co-Ordinator) या व्यतिरिक्त स्वच्छ सर्वेक्षण/घनकचरा व्यवस्थापन/ पर्यावरण विभागात कामाचा अनुभव | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल. | ४५,०००/- (पंचेचाळीस हजार रुपये) |

सविस्तर अटी, शर्ती व इतर माहिती नगर परिषद, ब्रम्हपुरी कार्यालय येथे पाहावयास उपलब्ध आहे. कोणतेही कारण न देता उमेदवारांचे अर्ज मंजूर करणे अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अर्जदाराच्या कोणत्याही अटी व शर्ती मान्य करण्यात येणार नाही.

स्वा/-

मुख्याधिकारी

नगर परिषद ब्रम्हपुरी